| MHKO050001352024 | **नियमित दिवाणी दावा क्र.२२/२०२४,**<br>**निशाणी क्र.२२ वरील आदेश.**<br>**दिलीप तुकाराम सावंत विरुध्द मंगला आनंदराव सावंत व इतर.** |
|---|---|

वादीने प्रस्तुतच्या अर्जाव्दारे प्रतिवादी क्र.५ करिता अ.पा.क. म्हणून प्रतिवादी क्र.२ यांची नेमणूक होऊन मिळण्याकरिता व अर्जात नमूद दुरुस्ती होऊन मिळणेसाठी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाखल केला आहे.

२. वादीचे कथन असे की, दावा हा प्रतिवादी विरुध्द वाटप व तुटक कब्जा होऊन मिळण्यासाठी दाखल केला असून प्रतिवादी क्र.५ सोडून सर्व प्रतिवादींना मा.न्यायालयाचे समन्स लागू झालेले आहेत. प्रतिवादी क्र.५ अनुष्का विजय सावंत यांना मा.न्यायालयाचे समन्स लागू करण्याकरिता बेलिफ गेले असता त्यांनी प्रतिवादी क्र.५ अनुष्का ह्या अज्ञान असल्याचा रिपोर्ट दिला आहे. प्रतिवादी क्र.५ अनुष्का हिचे वडील विजय आनंदराव सावंत हे या प्रकरणात प्रतिवादी क्र.२ आहेत. प्रतिवादी क्र.५ अनुष्का हिच्या आई रोहिणी विजय सावंत दि.१३/०९/२०१२ रोजी मयत झाल्या आहेत. प्रतिवादी क्र.५ यांना त्यांचे जवळचे नातेवाईक वडिल प्रतिवादी क्र.२ हे वगळता अन्य कोणीही नातेवाईक नाहीत. त्यामुळे प्रतिवादी क्र.२ विजय आनंदराव सावंत यांना प्रतिवादी क्र.५ अनुष्का विजय सावंत यांचे वडील अ.पा.क. म्हणून नेमणूक होणे न्यायाचे आहे. तसेच, त्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्याची परवानगी मिळावी म्हणून मागणी केली आहे. सबब, सदरचा अर्ज मंजुर करावा अशी विनंती केली.

३. प्रतिवादी क्र.१ ते ४ व ७ ते ९ यांनी सदर अर्जावर म्हणणे देऊन अर्जातील सर्व मजकूर नाकारला आहे. त्यांनी म्हणण्यात पुढे असे कथन केले आहे की, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम ७ च्या तरतुदीमध्ये अ.पा.क. नेमणुकीचा विषय येत नाही. अ.पा.क. नेमणुकीसाठी वादीने स्वतंत्र अर्ज देणे आवश्यक आहे. वादीने सदर अर्जात प्रतिवादी क्र.५ सोडून सर्व प्रतिवादींना समन्स लागू झाल्याबाबत व प्रतिवादी क्र.५ चे समन्स लागू करण्याकरिता बेलिफ गेले असता प्रतिवादी क्र.५ हे अज्ञान असल्याचा रिपोर्ट खोटा व चुकीचा आहे. प्रतिवादी क्र.५ करिता प्रतिवादी क्र.२ यांनी समन्स स्विकारल्याचा बेलिफ रिपोर्ट नि.क्र.५ व ७ वर दाखल आहे. वादीने खोटी कथने नमूद करुन सदरचा अर्ज दाखल केला आहे. सबब, सदरचा अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केली.

४. दोन्ही पक्षांतर्फे युक्तिवाद ऐकण्यात आला. अर्ज, म्हणणे व कागदपत्रे यांचे निरीक्षण केले.

५. प्रस्तुत दावा वाटप होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये वादीने प्रतिवादी क्र.५ अनुष्का विजय सावंत हिचे वय १८ वर्षे दाखविले व ती सज्ञान असल्याचे त्याद्वारे सुचविले आहे. नि.क्र.५ वरील बेलिफ अहवाल पाहिला असता प्रतिवादी क्र.५ ही अज्ञान असल्याबाबत बेलिफांनी नमूद केले नसून ती केवळ कॉलेजला गेली आहे म्हणून तिच्या दाव्याचे समन्स प्रतिवादी क्र.२ ने

घेतल्याबाबत नमूद आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र.१ ते ४ व ७ यांनी नि.क्र.२१ वर अर्ज देऊन प्रतिवादी क्र.५ ही अज्ञान असल्याबाबत कथन केले आहे व त्यासोबत प्रतिवादी क्र.५ चे जन्मप्रमाणपत्र दाखल केले आहे. त्यामध्ये प्रतिवादी क्र.५ ही दि.०५/०४/२००७ रोजी जन्म झाल्याचे दिसते. त्यावरुन प्रतिवादी क्र.५ ही दावा दाखल झाला त्यावेळी किंवा आज रोजी सज्ञान नाही असे स्पष्ट होते. वादीने दावा दाखल करतेवेळी प्रतिवादी क्र.५ बाबत योग्य ती काळजी घेणे गरजेचे होते. प्रतिवादी क्र.१ ते ४ व ७ ते ९ यांनी या अर्जाला म्हणणे देऊन आक्षेप घेतला परंतु, प्रतिवादी क्र.५ चे प्रतिवादी क्र.२ हे वडिल असल्याची बाब मान्य केली आहे. दाव्याचे स्वरुप वाटपासाठी आहे. त्यामध्ये सर्व आवश्यक पक्षकार सामील असणे गरजेचे आहे. प्रतिवादी क्र.२ यांनी जरी आक्षेप नोंदविला असला तरी त्यांनी ते प्रतिवादी क्र.५ चे वडील असल्याची बाब मान्य केली आहे. उपलब्ध कागदपत्रांवरुन प्रतिवादी क्र.५ अज्ञान आहे. वादीने नमूद केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र.५ ची आई रोहिणी विजय सावंत ह्या दि.१३/०९/२०२२ रोजी मयत आहेत. त्यामुळे प्रतिवादी क्र.५ ह्या अज्ञान मुलीचे प्रतिवादी क्र.२ हे एक वडील म्हणून नैसर्गिक पालनपोषणकर्ते आहेत. अन्य प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जाला जरी जोरदार आक्षेप घेतला असला तरी व अ.पा.क. म्हणून नेमणूक करण्याकरिता वेगळा अर्ज दिला नसला तरी प्रस्तुत अर्जाद्वारे मागणी करण्यात आलेल्या दोन्हीही मागण्या म्हणजेच प्रतिवादी क्र.२ ला प्रतिवादी क्र.५ चा अ.पा.क. करण्याबाबतची मागणी व त्याप्रमाणे दाव्यात योग्य ती दुरुस्ती करण्याची मागणी प्रकरणात विलंब टाळण्यासाठी मंजुर करणे अन्य प्रतिवादीला योग्य खर्च देऊन मान्य करणे न्यायाचे दिसते. सबब, पुढीलप्रमाणे आदेश:-

## आ दे श

१. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ४ व ७ ते ९ यांना एकत्रित रक्कम रु.५००/- खर्च देऊन मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.२ ला प्रतिवादी क्र.५ चा अ.पा.क. म्हणून याद्वारे नेमण्यात येते.

३. वादीने दाव्यात या अर्जात नमूद केलेप्रमाणे दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत १४ दिवसांचे आत दाखल करावी.

४. त्यानंतर प्रतिवादी क्र.५ यांना दाव्याचे समन्स काढण्यात यावे.

PATWE DATARAJ GUNAJIRAO
Digitally signed by PATWE DATARAJ GUNAJIRAO
Date: 2025.01.20 17:32:57 +0530

दि.२०/०१/२०२५.

(डॉ. डी.जी.पटवे)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, इचलकरंजी.